**सरकारतर्फे सा.क्र. १**

**शपथेवर**

**माझे नांव** : नितीन मच्छींद्र नवथर,
**वय** : ३२ वर्षे, धंदा : शेती,
**सध्या राहणार :** शहालीपिंप्री, ता. नेवासा, जि.अहमदनगर

**सरतपास सरकार पक्षातर्फे विद्वान सरकारी वकिल श्रीमती एस. पी. औताडे यांचेमार्फत शपथेवर सुरू —**

१. आरोपी क्र. १ ते ३ यांना मी ओळखतो कारण ते आमच्या गावचे रहिवासी आहेत. घटना दि.२८/११/२०२४ रोजी दुपारी ०१.३० वा. सुमारास ग्रामपंचायत कार्यालयासमोर घडली होती. सदर दिवशी मी ग्रामपंचायतीसमोर मोटारसायकीलवर बसलो होतो. त्यावेळी सौरभ नवथर तेथे आला व मला शिवीगाळ केली मी त्याला शिवीगाळ करू नको असे सांगत असताना त्याने मला हाताने मारहाण केली व तुला जिवे ठार मारेल अशी धमकी दिली. त्याच दिवशी रात्री १०.३० सुमारास मी गेवराई पाटाजवळुन जात असताना सौरव नवथर, सुयेश नवथर व पप्पू नवथर यांनी मला आडवुन मारहाण केली. सौरव नवथर याच्या हातात गज होता त्याने मला गजाने मारहाण केली. सुयेश नवथर आणि पप्पू नवथर यांनी मला लाकडी दांडक्याने मारले. माइया दोन्ही हातांना व बरगडीला मार लागला होता. त्यानंतर मी माझा भाउ अमोल नवथर व पप्पू नवथर यांना फोन केला. त्यांनी मला श्वास हॉस्पीटल येथे नेले. आरोपींविरूद्ध ३० तारखेला ती तक्रार दिली होती. आता मला फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. परंतु मी त्यावर सही केली नव्हती. जेव्हा पंचनामा करायला पोलीस आले होते तेव्हा मी सही केली होती. आता मला जी फिर्याद दाखविण्यात आली त्यावर मी सही केली नव्हती. ज्यांनी मला मारहाण केली होती त्यांना पाहिल्यास मी ओळखू शकतो. आजरोजी पप्पू आणि सुयेश न्यायालयात उपस्थित आहेत. न्यायालयात सौरभ उपस्थित नाही. **(नि.२१ वर आरोपी क्र.१ चा गैरहजेरी माफीचा अर्ज आरोपीची ओळख आव्हानित न करण्याच्या अटीवर मंजुर करण्यात आला.)**

<u>सरतपास पुर्ण</u>.

<u>आरोपींतर्फे विद्वान वकील श्री. व्ही. एम. गोरे यांच्यामार्फत उलटतपास सुरू</u>.

२. माझे शिक्षण इयत्ता ३ री पर्यंत झाले आहे. आरोपी हे माइयाच गावातील आहेत परंतु ते माझे भावकी नाहीत. यापूर्वी मी मालवाहु गाडी चालवण्याचे काम करीत होतो. ती मालवाहु गाडी माझी स्वत: ची होती. हे म्हणणे खरे आहे की, शेतक—यांचे कांदे मी माइया गाडीतुन मार्केटला घेउन जात होतो. हे म्हणणे खरे आहे की, मी व्यापा—याकडुन शेतक—यांच्या विकलेल्या कांद्याचे पैसे घेउन येत होतो. हे म्हणणे खरे आहे की, माझी मालवाहू गाडी मी लोनवर घेतली होती व त्याचे काही हप्ते थकलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, व्यापा—याकडुन मिळालेले कांद्याचे पैसे मी गाडीचे लोन फेडण्यासाठी वापरत होतो. हे म्हणणे खरे नाही की, सौरभ नवथर यांचे कांदे विकण्याकरीता मी माइया मालवाहू गाडीतुन नेले होते. हे म्हणणे खरे नाही की, सौरभ नवथर याच्या विकलेल्या कांद्याचे पैसे मी स्वत: वापरलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, सौरभ नवथर ते पैसे मला वारंवार मागत होता. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी सौरभ नवथर हा मला कांद्याचे पैसे मागत होता. हे म्हणणे खरे नाही की, पैसे मागण्याच्या कारणावरून मी सौरभशी वाद घातले. हे म्हणणे खरे नाही की, मीच सौरभच्या कानाखाली मारली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी, माझा भाउ अमोल व पप्पू अशा तिघांनी आरोपी सौरभला मारले. आरोपी क्र. १ ते ३ हे माइयाविरूद्ध पोलीस ठाण्यात तक्रार द्यायला गेले होते किंवा कसे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या भांडणाची मिटवामिटव झाली होती. आरोपीने माइयाविरूद्ध केस दाखल करू नये असे गावातील मध्यस्थींच्या सांगण्यावरून आरोपींनी माइयाविरूद्ध केस दाखल केली नाही याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, सौरभने मला पुन्हा दुस—या दिवशी पैसे मागितले होते. हे म्हणणे खरे नाही की, सौरभचे पैसे बुडवण्यासाठी मी त्याच्याविरूद्ध खोटी केस केली. हे म्हणणे खरे नाही की, गावात माझे स्वत:चे दुकान आहे.

साक्षीदार सांगतो की, गावात माइया कुटुंबाचे व आरोपींचे दुकान आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या दुकानात दारूची विक्री होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आमच्यावर केस झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, दारू विक्रीमुळे माइयावर गुन्हा दाखल आहे. हे म्हणणे खरे नाही की, जुगारबंदीच्या कायद्याअंतर्गत पोलीसांनी मला पकडले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी जुगारबंदीच्या कायद्याअंतर्गत पोलीसांना माझे नाव दिले याचा संशय मला होता व त्यामुळे माझा आरोपींवर राग होता. घटनेच्या दिवशी रात्रीच्या वेळी मी दवाखानात चाललो होतो. माइया बरगडीला लागले होते त्यामुळे मी गेवराई येथे असलेल्या दवाखान्यात चाललो होतो. हे म्हणणे खरे आहे की, गेवराईचे दवाखाने हे नउ वाजता बंद होतात. हे म्हणणे खरे नाही की, घ टनेचया दिवशी रात्री नउ वाजता मी घरी होतो गेवराईला चाललो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात सांगितल्याप्रमाणे मला जखमा झाल्या नव्हत्या व मी ते खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला मारहाण केली हे मी खोटे सांगत आहे.

**आरोपीतर्फे आरोपीच्या विद्वान वकीलांना साक्षीदाराच्या उलटतपासासाठी वेळ मागितली.**

**<u>उलटतपास तहकुब</u>**

**श्रवणोत्तर स्विकृती**

स्वाक्षरीत/—
**(लीना अ. काळे)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.४,नेवासा

दिनांक :१६/०२/२०२६